GOVERNMENT OF MAHARASHTRA

# मुंबई उपनगर जिल्हा खनिज प्रतिष्ठान

# (Mumbai Suburban District Mineral Foundation)

## जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल (२०२२-२३)

जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा

Collector Office, Mumbai Suburban District

# जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल (२०२२-२३)

## District Mineral Foundation Annual Report (2022-23)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेचे उद्दिष्ट | ४ |
| ३ | प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची व्याप्ती | ४ ते ६ |
| ४ | प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्र | ५ |
| ५ | नियामक परिषद आणि व्यवस्थापकीय समिती रचना | ६ ते ८ |
| ६ | वार्षिक लेखा अहवाल | ९ ते ११ |
| ७ | संबंधित आर्थिक वर्षात जमा महसूल/डीएमएफ निधी | १२ |
| ८ | संबंधित आर्थिक वर्षात मंजूर एकूण कामे | १३ |

## प्रस्तावना:-

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम,१९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब चे उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २० ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने भारत सरकार, खाण मंत्रालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान गठित करण्याबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्ये आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये रकमा प्रदान करणे च्या पध्दतीचे विनियमन करण्याकरीता महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम,२०१६ तयार केले आहेत. तसेच सदर नियमामध्ये नियामक परिषद (Governing Council) व व्यवस्थापन समितीची (Managing Committee) रचना व समितीचे अधिकार व कार्य अधिसुचित केलेले आहेत.

यानुसार मुंबई उपनगर जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत गौणखनिजावरील स्वामित्वधाचे १०% अंशदान/निधी संकलीत करणेकरीता जिल्हा खनिज प्रतिष्ठान मुंबई उपनगर यांचे नावे "भारतीय स्टेट बँक", शासकीय वसाहत, बांद्रा (पू) येथे बचत खाते उघडण्यात आले असुन त्याचे खाते क्र. ३९०४०६७९६७५ आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.२१ नोव्हेंबर,२०२२ मध्ये रोजी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या अनुषंगाने सुधारीत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खाणबाधित क्षेत्रामध्ये विकास करणेबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेले आहेत. त्यामध्ये प्रत्यक्ष बाधित क्षेत्रामध्ये ६०% निधी व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रामध्ये ४०% निधी खर्च करण्याची तरतूद केलेली आहे.
त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे –

| | **उच्च प्राथम्य बाबी (६०%)** | **अन्य प्राथम्य बाबी (४०%)** |
|---|---|---|
| अ.क्र. | बाब | बाब |
| १ | आरोग्य | १) भौतिक पायाभूत सुविधा, रस्ते , पुल, रेल्वे व जल वाहतूक प्रकल्प . |
| २ | शिक्षण | २) जलसंपदा |
| ३ | पर्यावरण, संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना | ३) उर्जा व पाणलोट क्षेत्र विकास |
| ४ | इतर- **अ)** पिण्याचे पाणी पुरवठा<br>**ब)** महिला व बालकल्याण<br>**क)** वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण<br>**ड)** शल्य विकास. | ४) खनिकर्म जिल्ह्यातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याकरिता अन्य उपाययोजना |

**१) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची उद्दिष्टे:-**जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यांमुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्रांचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, कामे करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे.

**२) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची व्याप्ती :-** प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना मधील प्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरीत कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. प्रस्तुत योजनेत खाण बाधित क्षेत्राचा विकास करताना हाती घ्यावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**अ) उच्च प्राथम्य बाबी -** ज्या ठिकाणी योजनेतील किमान ६०% निधी खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

**I) पिण्याचे पाणी पुरवठा:-** केंद्रीभूत जलशुध्दीकरण यंत्रणा, जलप्रक्रिया केंद्र, तात्पुरती/शाश्वत जल वितरण सुविधा ज्यामध्ये एकल पाणी पुरवठा योजनेचा समावेश असेल, जल वितरण पाईपलाईन टाकणे.

II) **पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रण उपाययोजना :-** सांडपाणी प्रक्रिया केंद्र तलाव भूजल नाले व अन्य जल स्त्रोतांचा प्रदूषण नियंत्रण खाणकाम व डम्सच्या कृतीमुळे त्या क्षेत्रात होणाऱ्या वायू व जल प्रदूषण कमी करणे. खाण सांडपाणी व्यवस्था, पर्यावरण सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता चालु व बंद खाणीतील जल, वायू व जमीन प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व खाण प्रदूषण प्रतिबंधक तंत्रज्ञान, आणि उपाययोजना.

III) **आरोग्य:-** खाण बाधीत क्षेत्रामध्ये प्राथमिक/माध्यमिक आरोग्य सुविधा पुरविणे हे उद्दिष्ट असावे. यामध्ये केवळ आरोग्य पायाभूत सुविधा निर्मितीवर भर नसावा पण त्यासोबत आवश्यक मनुष्यबळ साधन साहित्य देखील पुरविण्यात याव्यात जेणेकरून परिणामकारकरित्या उपयोगात येतील. याव्दारे निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा स्थानिक प्रशासन, राज्य व केंद्र शासन यांच्याव्दारे निर्माण केलेल्या अस्तीत्वातील आरोग्य सुविधाला सहाय्यभूत असतील. खाणीशी निगडीत आजार व रोगांवर उपाययोजना करण्याकरिता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायनर्स हेल्थ (**National Institute of Miner's Health**) यांच्याकडील तांत्रिक सहाय्य घेवून विशेष सुविधा निर्माण करता येतील. खाण बाधीत व्यक्तींच्या गट आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी करता येईल.

IV) **शिक्षण :-** शाळेची इमारत बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम, प्रयोगशाळा, वाचनालय, कलावर्ग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी सुविधा, शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता निवासी होस्टेल, क्रिडा सुविधा, शिक्षक व अन्य सहाय्यभूत कर्मचारी यांच्या सेवा, ई-शिक्षण सुविधा, अन्य परिवहन सुविधा जसे बस / सायकल / रिक्षा/ इत्यादि. पोषण आहार निगडीत कार्यक्रम राबविणे.

V) **महिला व बालविकास:-** प्रस्तूत योजनेअंतर्गत माता व बाल आरोग्य कुपोषण, संसर्गजन्य आजार यांच्याशी निगडीत समस्यांवर उपाययोजना घेता येतील.

VI) **वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण :-** प्रस्तूत योजने अंतर्गत वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण योजना हाती घेता येतील.

VII) **कौशल्य विकास:-** स्थानिक पात्र व्यक्तींच्या आर्थिक प्रगती व उत्पन्न वाढीसाठी व उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास, प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्र,स्वयंरोजगार योजना व स्वयंसहाय्यता गटांना सहाय्य

VIII) **स्वच्छता :-** कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता, मल निस्सारण प्रक्रिया केंद्र, सार्वजनिक स्वच्छतागृहे व इतर अनुषंगिक सुविधा

**ब)अन्य प्राथम्य बाबी:-**ज्या ठिकाणी प्रस्तुत योजनेतील कमाल ४०% निधी खर्च करता येईल. त्यामध्ये भौतिक पायाभूत सुविधा रस्ते, पुल, रेल्वे व जल वाहतूक प्रकल्प इत्यादी कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

## ३) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्र :-

मुंबई उपनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ३६९ चौ.मी. इतके आहे. या जिल्ह्यात एकुण २ उप विभाग ( उप विभागीय अधिकारी पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय) व ३ तालुके (अंधेरी , बोरीवली, कुर्ला) आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या उत्तरेस ठाणे जिल्हा, दक्षिणेस मुंबई शहर जिल्हा, पूर्वेस ठाणे खाडी, व दक्षिणेस अरबी समुद्र अशी भौगोलिक रचना आहे.

मुंबई उपनगर जिल्हा हा संपूर्णपणे शहरी भू-भाग आहे. सदर जिल्ह्यामध्ये आज रोजी कोणताही खाणपट्टा व वाळूघाट अस्तित्वात नाही. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये सन २००६ नंतर दगड खाणपट्टे/खाणी बंद झाल्या आहेत. म्हणजेच सदर खाणी १७ वर्षापूर्वीच बंद झालेल्या आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात खाणपट्टे अस्तित्वात नसल्याने गौण खनिजांच्या खाणपट्ट्यांचे लिलाव करण्यात येत नाहीत. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये कोणतीही प्रमुख नदी/खाडीपात्रात उपयुक्त वाळू/रेती उपलब्ध नसल्याने या जिल्ह्यामध्ये वाळू/रेती उत्खनन व वाळू व्यतिरिक्त अन्य गौण खनिजांचे लिलाव होत नाहीत. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये खाणबाधित क्षेत्र नाही. या जिल्ह्यात प्रामुख्याने नव्याने बांधल्या जाणा-या किंवा पुर्नविकास होणा-या इमारतीच्या बांधकामासाठी करण्यात येणा-या पाया/तळघर खोदकामाकरीता तात्पुरते गौण खनिज परवाने देण्यात येतात.

## ४) संबंधित आर्थिक वर्षामध्ये नियामक परिषद आणि व्यवस्थापकीय समिती यावर असलेल्या सदस्यांची नावे :-

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक ०१/०९/२०१६ मध्ये प्रसिध्द अधिसुचनेत महाराष्ट्र राज्यातील सर्व महसूली जिल्ह्यामध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान (**District Mineral Foundation Trust**) स्थापन करण्याचे अधिसुचित केलेले आहे. सदर अधिसुचनेनुसार परिच्छेद क्रं. ०१ मध्ये नमुद केले आहे की, "सदर अधिसुचनेनूसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात (**बृहन्मुंबई जिल्हा वगळून**) जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करून नियामक परिषद व व्यवस्थापन समिती स्थापन करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी नियामक परिषद व व्यवस्थापन समिती स्थापन करावी अगर कसे? याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे या कार्यालयाने शासनास वेळोवेळी मार्गदर्शन मागितले होते. तथापि महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र क्र. डीएमएफ-१११९/प्र.क्र. ५९/उ-९ दि.२८/११/२०१९ अन्वये शासन पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये 'मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा हे दोन्ही जिल्हे वेगवेगळे असून, त्यापैकी

दिनांक ३०.११.२०१६ च्या अधिसुचने अन्वये बृहन्मुंबई जिल्हा या शब्दाऐवजी मुंबई शहर जिल्हा असा बदल करण्यात आला आहे. त्यामुळे फक्त मुंबई शहर जिल्हा वगळून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांना वरील संदर्भीय तीनही अधिसुचना लागू होतात. (०१.०९.२०१६ रोजीच्या दोन्ही अधिसूचना व शासन निर्णय, ३०.११.२०१६ ची अधिसूचना) यामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्याचा देखील समावेश होतो. सबब, मुंबई उपनगर जिल्ह्याकरीता जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषद व व्यवस्थापन समिती स्थापन करणेबाबत उचित कार्यवाही करावी व आवश्यकतेनुसार प्रस्ताव शासनास सादर करावा" असे निर्देश दिले आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेकडील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-ल दि.०६/१२/२०२१ अन्वये खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) मधील कलम ९ ब चे उप- कलम (३) आणि कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए आणि उक्त अधिनियमातील कलम २० ए अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये केंद्र शासनाने पारीत केलेल्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र शासनाने खालीलप्रमाणे जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास), नियम,२०१६ मध्ये सुधारणा करणेत आली आहे.

महाराष्ट्र शासनानचे राजपत्र असाधारण भाग चार-अ, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक ०६/१२/२०२१ मध्ये महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम,२०२१ हे सुधारीत नियम प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. व त्यामध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान **नियामक परिषद** (Governing Council) ची रचना नमूद केली आहे.

## अ) मुंबई उपनगर जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेची रचना

| अनु.क्रं. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | लोकसभा सदस्य (२६- मुंबई उत्तर मतदार, संघ) | सदस्य |
| ३. | लोकसभा सदस्य (२७- मुंबई उत्तर-प, मतदार संघ) | सदस्य |
| ४. | लोकसभा सदस्य (२८- मुंबई उत्तर- पू, मतदार संघ) | सदस्य |
| ५. | लोकसभा सदस्य (२९- मुंबई उत्तर- मध्य, मतदार संघ) | सदस्य |
| ६. | लोकसभा सदस्य (३०- मुंबई दक्षिण-मध्य, मतदार संघ) | सदस्य |
| ७. | विधानसभा सदस्य (१५२-बोरीवली, मतदार संघ) | सदस्य |
| ८. | विधानसभा सदस्य (१५३- दहिसर मतदार संघ) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. | विधानसभा सदस्य (१५४- मागाठाणे मतदार संघ) | सदस्य |
| १०. | विधानसभा सदस्य (१५५- मुलुंड मतदार संघ) | सदस्य |
| ११. | विधानसभा सदस्य (१५६- विक्रोळी मतदार संघ) | सदस्य |
| १२. | विधानसभा सदस्य (१५७- भांडूप (प) मतदार संघ) | सदस्य |
| १३. | विधानसभा सदस्य (१५८- जोगेश्वरी (पू) मतदार संघ) | सदस्य |
| १४. | विधानसभा सदस्य (१५९- दिंडोशी मतदार संघ) | सदस्य |
| १५. | विधानसभा सदस्य १६०- (कांदिवली मतदार संघ) | सदस्य |
| १६. | विधानसभा सदस्य (१६१- चारकोप मतदार संघ) | सदस्य |
| १७. | विधानसभा सदस्य (१६२- मालाड (प) मतदार संघ) | सदस्य |
| १८. | विधानसभा सदस्य (१६३- गोरेगाव मतदार संघ) | सदस्य |
| १९. | विधानसभा सदस्य (१६४- वर्सोवा मतदार संघ) | सदस्य |
| २०. | विधानसभा सदस्य (१६५- अंधेरी (प) मतदार संघ) | सदस्य |
| २१. | विधानसभा सदस्य (१६६- अंधेरी (पू) मतदार संघ) | सदस्य |
| २२. | विधानसभा सदस्य (१६७- विलेपार्ले मतदार संघ) | सदस्य |
| २३. | विधानसभा सदस्य (१६८- चांदिवली मतदार संघ) | सदस्य |
| २४. | विधानसभा सदस्य (१६९- घाटकोपर पश्चिम मतदार संघ) | सदस्य |
| २५. | विधानसभा सदस्य (१७०- घाटकोपर पूर्व मतदार संघ) | सदस्य |
| २६. | विधानसभा सदस्य, (१७१- मानखुर्द शिवाजी नगर मतदार संघ) | सदस्य |
| २७. | विधानसभा सदस्य , (१७२- अणुशक्तीनगर मतदार संघ) | सदस्य |
| २८. | विधानसभा सदस्य, (१७३- चेंबूर मतदार संघ) | सदस्य |
| २९. | विधानसभा सदस्य, (१७४- कुर्ला मतदार संघ) | सदस्य |
| ३०. | विधानसभा सदस्य , (१७५- कलिना मतदार संघ) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३१. | विधानसभा सदस्य, (१७६- वांद्रे (पू) मतदार संघ) | सदस्य |
| ३२. | विधानसभा सदस्य, (१७७- वांद्रे (प) मतदार संघ) | सदस्य |
| ३३. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | पदसिद्ध सदस्य |
| ३४. | जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ३५. | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ३६. | जिल्हा आरोग्य अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ३७. | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ३८. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (DIC) | पदसिद्ध सदस्य |
| ३९. | जिल्हा खनिकर्म अधिकारी | पदसिद्ध सदस्य सचिव |

## ब) व्यवस्थापन समिती (Managing Committee) :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका | पदसिद्ध सदस्य |
| ३ | जिल्हा व्यावसाय व प्रशिक्षण अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ४ | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ५ | जिल्हा आरोग्य अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ६ | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| ७ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (DIC) | पदसिद्ध सदस्य |
| ८ | प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ९ | जिल्हा खनिकर्म अधिकारी | पदसिध्द सदस्य सचिव |

# मुंबई उपनगर जिल्हा खनिज प्रतिष्ठान

## वार्षिक लेखापरीक्षण अहवाल – २०२२-२३

| बॅलेन्स शीट दि.३१/०३/२०२३ अखेर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तपशील | रु | रु. | मालमत्ता | रु. | रु. |
| जमा व खर्च<br>सुरुवातीची<br>शिल्लक | ७,५३,३३,४९१.०० | २२,४०,७३,६४२.०० | वर्तमान मालमत्ता<br>Sundry Debtors | | ३९,४४,७९७.०० |
| वार्षिक जमा<br>रक्कम | १४,८७,४०,१५१.०० | २५,७९,०३,५५४.०० | बँक बॅलन्स<br>स्टेट बँक ऑफ इंडिया<br>A/c.<br>३९०४०६७९६७५ | | ५०,५९,२२,६५६.०० |
| PMKKKY<br>अंतर्गत प्रस्तावित<br>खर्च | २९,२७,००,०००.००<br>३,४७,९६,४४६.०० | | | | |
| Less: Assigned to Projects Dr.R.N.Cooper Hospital – Postmortem Autopsy Centre | २,२३,२२,११०.०० | १,७८,५७,६८८.०० | | | |
| Less : Amount spent | ४४,६४,४२२.०० | | | | |
| Rajawadi Hospital – Postmortem Autopsy Centre | १,२४,७४,३३६.०० | ९९,७९,४६९.०० | | | |
| Less : Amount spent | २४,९४,८६७.०० | | | | |
| वर्तमान दायित्व<br>ऑडिट फीस | | ५३,१००.०० | | | |
| | | ५०,९८,६७,४५३.०० | | | ५०,९८,६७,४५३.०० |

## जमा व खर्च रक्कमेचा लेखा- दि. ३१ मार्च २०२३ अखेर

| खर्च | रु | रु. | जमा | रु. | रु. |
|---|---|---|---|---|---|
| Bank Charges<br>ऑडीट फीस | | १७७.००<br>५३,१००.०० | जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान निधी मधून प्राप्त उत्पन्न (DMF) | | १३,६७,०३,७२०.०० |
| | | | बचत रक्कमेवरील व्याज | | १,२०,८९,७०८.०० |
| शिल्लक | | १४,८७,४०१५१.०० | | | |
| | | १४,८७,९३,४२८.०० | | | १४,८७,९३,४२८.०० |

### जमा व देयक रक्कमेचा लेखा दि. ३१ मार्च २०२३ अखेर

| तपशील | रु | रु. | तपशील | रु. | |
|---|---|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया<br>A/c. ३९०४०६७९६७५ | | | Development and Welfare Expenses<br>Postmortem Autopsy Centre at Dr. R.N.Cooper Hospital<br>Postmortem Autopsy Centre at Rajawadi Hospital | ४४,६४,४२२.००<br>२४,९४,८६७.०० | ६९,५९,२८९.०० |
| सुरूवातीची शिल्लक | | ३६,३७,२४,३११.०० | Audit Fees Payable | | १,०६,२००.०० |
| Sundry Debtors<br>Cess जमा | | ४,७०,५८३.००<br>१३,६७,०३,७२०.०० | Bank Charges | | १७७.०० |
| व्याज | | १,२०,८९,७०८.०० | स्टेट बँक ऑफ इंडिया<br>A/c. ३९०४०६७९६७५<br>वर्षा अखेर शिल्लक | | ५०,५९,२२,६५६.०० |
| एकूण | | ५१,२९,८८,३२२.०० | एकूण | | ५१,२९,८८,३२२.०० |

जिल्हा खनिकर्म अधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

मेसर्स डी. बी. केतकर अँड कंपनी (सनदी लेखापाल), दादर, मुंबई-२८ यांनी केलेल्या लेखापरीक्षण अहवालानुसार.

## संबंधित आर्थिक वर्षात जमा महसूल/डीएमएफ निधी :-

| अ. क्र. | वर्ष | मागिल शिल्लक निधी (रु. लक्ष) | या वर्षीचा जमा निधी (रु. लक्ष) | एकूण (रु. लक्ष) | प्रशासकीय मान्यता (संख्या) | वितरित निधी (रु. लक्ष) | खर्च (रु. लक्ष) | कामांची सद्यस्थिती | | | | शिल्लक (रु. लक्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पूर्ण | प्रगतीत | निविदा | रद्द | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | **२०२२-२३** | **३६३७.२४** | **१४९२.६४** | **५१२९.८८** | **२** | **०.६९** | **०.६९** | **निरंक** | **५०% काम झाले आहे.** | **निरंक** | **निरंक** | **५१२९.२** | **-** |

## संबंधित आर्थिक वर्षात मंजूर एकूण कामे :-

| **अ. क्र.** | **सन** | **मंजूर कामे** | **मंजूर निधी** (रु. लक्ष) | **वाटप केलेला निधी** (रु. लक्ष) | **कामाची सद्यस्थिती** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२०२२-२३** | **२** | **३.४८** | **०.६९** | १) डॉ. आर. एन. कुपर रुग्णालय, विलेपार्ले येथील शवविच्छेदन केंद्र व शवागृहाच्या दुरुस्तीच्या कामासाठी सहा. आयुक्त (नियोजन), बृहन्मुंबई महानगर पालिका यांना सदर कामासाठी रक्कम रु. २,२३,२२,११०/- एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी र. रु. ४४,६४,४२२/- एवढ्या रकमेचे दि.१९/०१/२०२३ रोजी पहिल्या टप्याचे (२०% निधी) वितरण आदेश पारीत केले आहेत.<br>**२)** राजावाडी रुग्णालय, घाटकोपर (पू) येथील शवविच्छेदन केंद्र व शवागृहाच्या दुरुस्तीच्या कामासाठी सहा. आयुक्त (नियोजन), बृहन्मुंबई महानगर पालिका यांना सदर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कामासाठी रक्कम रु. १,२४,७४,३३६/- एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी र.रु.२४,९४,८६७/- एवढ्या रकमेचे दि.१९/०१/२०२३ रोजी पहिल्या टप्याचे (२०% निधी) निधी वितरण करण्यात आला आहे. वरील दोन्ही कामे प्रगतीपथावर असून उर्वरीत निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. |

----------------********---------------

# Index


| Sr. No | Subject | Page No. |
|---|---|---|
| **1** | Introduction | **1** |
| **2** | Objective of Pradhan Mantri Khanij kshetra Kalyan Yojana(PMKKKY) | **2** |
| **3** | Scope of Mumbai Suburban District Mineral Foundation | **3** |
| **4** | Geographical setup & Administrative Structure Mumbai Suburban | **4** |
| **5** | Structure of Governing council and Management Committee | **5 To 8** |
| **6** | Audit report of CA. | **9** |
| **7** | DMF Fund Collection | **10** |
| **8** | Sanctioned work during year | **11** |

## INTRODUCTION:-

According to the provisions of Section 9 (b) of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957, the State Government shall notify the establishment of a Mineral Development Foundation for each district for the development of mineral affected areas. The central government should take a decision on the matter and there should be unanimity for the development of mineral affected areas through mineral development institutes in all the states of the country and in such a program, social development and basic needs of the population and the local needs of affected areas should be taken into consideration and guidelines for implementation of Pradhan Mantri Khanij khetra Kanlyan Yojana(PMKKKY), District Mineral Foundation Fund. Reference by letter dated 16.9.2015, all the States have been directed to implement the Pradhan Mantri Khanij kshetra Kanlyan Yojana(PMKKKY),presented by the Central Government to the State Governments in accordance with the provisions of Section 20 (a) of the Mines (Development and Regulation) Act, 1957and guidelines accordingly. Instructions have been given to incorporate the instructions in the regulations of the District.

## About Pradhan Mantri Khanij Kshetra Kalyan Yojana (PMKKKY)

**The Pradhan Mantri Khanij Kshetra KalyanYojana (PMKKKY) will be implemented by the District Mineral Foundations (DMFs) of the respective districts using the funds accruing to the DMF.**

**Objective of PMKKKY**

- To implement various developmental and welfare projects/programs in mining affected areas , and these projects/ programs will be complementing the existing ongoing schemes/projects of State and Central Government;
- To minimize /mitigate the adverse impacts, during and after mining, on the environment, health and socio-economics of people in mining districts; and
- To ensure long – term sustainable livelihoods for the affected people in mining area

## High priority areas – at least 60% of PMKKKY funds to be utilized under theseheads

- **Drinking Water Supply** : centralized purification systems, water treatment plants, permanent/temporary water distribution network including standalone facilities for drinking water, laying of piped water supply system.

- **Environment preservation and pollution control measures :** effluent treatment plants, prevention of pollution of streams, lakes, ponds, ground water, other water sources in the region, measure for controlling air and dust pollution caused by mining operations and dumps, mine drainage system, mine pollution prevention technologies, and measures for working or abandoned mines and other air, water & surface pollution control mechanisms required for environment-friendly and sustainable mine development.

- **Health Care :** the focus must be on creation of primary / secondary health care facilities in the affected areas. The emphasis should not be only on the creation of the health care infrastructure, but also on provision of necessary staffing, equipment and supplies required for making such facilities effective. To that extent, the effort should be to supplement and work in convergence with the existing health care infrastructure of the local bodies, state and Central government. The expertise available with the National Institute of Miners' Health may also be drawn upon to design special infrastructure needed to take care of mining related illnesses and diseases. Group Insurance Scheme for health care may be implemented for mining affected persons.

- **<u>Education :</u>** construction of school buildings, Additional class rooms, Laboratories, Libraries, Art and crafts room, Toilet blocks, Drinking water provisions Residential Hostels for students/teachers in remote areas,, sports infrastructure, engagement of teachers/other supporting staff, e-learning setup, other arrangement of transport facilities (bus/van/cycles/rickshaws/etc.) and nutrition related programs.
- **<u>Welfare of Women and Children :</u>** Special programs for addressing problems of maternal and child health, malnutrition, infectious diseases, etc. can be taken up under the PMKKKY.

- **<u>Welfare of Aged and Disabled people :</u>**Special program for welfare of aged and disabled people.

- **<u>Skill Development :</u>** skill development for livelihood support, income generation and economic activities for local eligible persons. The projects /schemes may include training, development of skill development center, self-employment schemes, support to Self Help Groups and provision of forward and backward linkages for such self-employment economic activities.

- **<u>Sanitation :</u>** collection, transportation & disposal of waste, cleaning of public places, provision of proper drainage & Sewage Treatment Plant, provision for disposal of fecal sludge, provision of toilets and other related activities.

## <u>Other priority Areas – Up to 40% of the PMKKKY to be utilized under these heads:-</u>

- **<u>Physical Infrastructure</u> :** providing required physical infrastructure – road, bridges, railways and waterways projects.

- **<u>Irrigation :</u>** developing alternate sources of irrigation, adoption of suitable and advanced irrigation techniques.

- **<u>Energy and Watershed Development :</u>** Development of alternate source of energy (including micro-hydel) and rainwater harvesting system. Development of orchards, integrated farming and economic forestry and restoration of catchments.

- Any other measures for enhancing environmental quality in mining district.

## 3) Directly and Indirectly Mining Affected Areas:-

The Mumbai Suburban District has an area of about 369 sq. kms. There are a total of 2 Sub Divisions (Sub Divisional Officer Eastern Suburbs/ Western Suburbs) and 3 Tehsils (Andheri, Borivali, Kurla) in this district. The geographical location of Mumbai Suburban District is such that the Thane District is to the North, Mumbai City District is to the South, Thane Creek to the East, and the Arabian Sea to the west.

Mumbai Suburban District is entirely an urban city area. Today there is no mining leases or sand ghat in this district. Mining in the Mumbai Suburban District is mainly done in the form of temporary quarriesfor basement excavation of buildings. The said building construction related excavation is carried out at various places around the district. However, considering the geography and size of the Mumbai Suburban District, the entire district has been treated as andirectly affected area (area within 20 km radius of the mining lease/quarry).

## 4) Members of the Governing Council and Managing Committee:-

In the notification dated 01/09/2016 of the Industries, energy and Labor Department of the Government of Maharashtra, it has been directed to establish District Mineral Foundation Trust in all the revenue districts of the state of Maharashtra (except Greater Mumbai District

As mentioned above, there was a state of confusion regarding whether to established DMF for Mumbai Suburban District or not? After multiple representations to the government from time to time,letter from Government of Maharashtra Industry,Energy and Labour Department dated 28/11/2019was recived clearifing both the districts 'Mumbai City and Mumbai Suburban District' are different, out of which, vide notification dated 30.11.2016, the word ' greater mumbai District' has been replaced to Mumbai City District. Therefore all the above referenced three notifications are applicable to all other districts of the state except Mumbai city district only. (Both notification and government decision dated 01.09.2016, 30.11.2016 regarding the establishment of regulatory council and management committee) it was directed that appropriate action should be taken and proposals should be submitted to the government as required.

Accordingly, as per the instructions received from the Government letter dated 28/11/2019, the Management Committee and Governing Council of Mumbai Suburban District Mineral Foundation have been established.

## A) Governing Council

| Sr. No | Designation | Position In The Committee |
|---|---|---|
| 1 | Hon. Collector, Mumbai Suburban District | Chairman |
| 2 | Lok Sabha Member (26- Mumbai North North, Sangh) | Member |
| 3 | Lok Sabha Member, (27- Mumbai North-W, Constituency) | Member |
| 4 | Lok Sabha Member, (28- Mumbai North-East, Constituency) | Member |
| 5 | Lok Sabha Member, (29- Mumbai North-Central, Constituency) | Member |
| 6 | Lok Sabha Member, (30- Mumbai South-Central, Electoral Union) | Member |
| 7 | Member of Legislative Assembly, (153- Dahisar Constituency) | Member |
| 8 | Member of Legislative Assembly, (154- Magathane Constituency) | Member |
| 9 | Member of Legislative Assembly (155- Mulund Constituency) | Member |
| 10 | Member of Legislative Assembly, (156- Vikhroli Constituency) | Member |
| 11 | Member of Legislative Assembly, (157- Bhandup (W) Constituency) | Member |
| 12 | Member of Legislative Assembly, (158- Jogeshwari (East) Constituency) | Member |

| | | |
|---|---|---|
| | | |
| 13 | Member of Legislative Assembly (159- Dindoshi Constituency) | Member |
| 14 | Member of Legislative Assembly, (160- Kandivali Constituency) | Member |
| 15 | Member of Legislative Assembly, (161- Charkop Constituency) Assembly Member | Member |
| 16 | Member of Legislative Assembly, (162- Malad (W) Constituency) | Member |
| 17 | Member of Legislative Assembly, (163- Goregaon Constituency) | Member |
| 18 | Member of Legislative Assembly(164- Versova Constituency) | Member |
| 19 | Member of Legislative Assembly (165- Andheri (W) Constituency) | Member |
| 20 | Member of Legislative Assembly, (166- Andheri (East) Constituency) | Member |
| 21 | Member of Legislative Assembly, (167-Vileparle Constituency) | Member |
| 22 | Assembly Member, (168- Chandivali Constituency) | Member |
| 23 | Member of Legislative Assembly (169-Ghatkopar West Constituency) | Member |
| 24 | Member of Legislative Assembly, (170-Ghatkopar East Constituency) | |
| 25 | Assembly Member, (171- Mankhurd Shivaji Nagar Constituency) | Member |

| | | |
|---|---|---|
| 26 | Member of Legislative Assembly, (172-Anushaktinagar Constituency) | Member |
| 27 | Member of Legislative Assembly, (173- Chembur Constituency) | Member |
| 28 | Member of Legislative Assembly, (174- Kurla Constituency) | Member |
| 29 | Member of Legislative Assembly, (175- Kalina Constituency) | Member |
| 30 | Member of Legislative Assembly, (176- Bandra (East) Constituency) | Member |
| 31 | Member of Legislative Assembly, (177- Bandra (W) Constituency) | Member |
| 32 | Commissionar | Ex-Officio Member |
| 33 | District Vocational Training Officer | Ex-Officio Member |
| 34 | District Tribal Welfare Officer | Ex-Officio Member |
| 35 | District Health Officer | Ex-Officio Member |
| 36 | District Women and Child Development Officer | Ex-Officio Member |
| 37 | One representative of Maharashtra Pollution Control Board, | Ex-Officio Member |
| 38 | General Manager, District Industries Centre (DIC) | Ex-Officio Member |
| 39 | District Mining Officer | Member-Secretary |

## B) Managing Committee:-

| Sr. No. | Designation | Position In The Committee |
|---|---|---|
| 1 | Hon. Collector, Mumbai Suburban | Ex-Officio Chairperson |
| 2 | Commissionar | Member |
| 3 | District Mining Officer | Member-Secretary |
| 4 | District Vocational Training Officer | Member |
| 5 | District Tribal Welfare Officer | Member |
| 6 | District Health Officer | Member |
| 7 | District Women and Child Development Officer | Member |
| 8 | One representative of Maharashtra Pollution Control Board, | Member |
| 9 | General Manager, District Industries Centre (DIC) | Member |

## DMF Funds Collect in the Year :-

| Sr. No. | Year | Last Balance Funds (In Lacs) | Funds Collected in this year (In Lacs) | Total (In Lacs) | Administrative Approval | Fund Disbursed (In Lacs) | Expenditure (In Lacs) | Current Status of works | | | | Balance |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Complete | In progress | Tender | Cancel | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| **1** | **2022-23** | **3637.24** | **1492.64** | **5129.88** | **2** | **0.69** | **0.69** | **NIL** | **50% work completed** | **NIL** | **NIL** | **5129.2** |

## Total Approval works in the year :-

**(In Lacs)**

| Sr. No. | Year | Approval Works | Approval Funds | Fund Disbursed | Status of works |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2022-23** | **2** | **3.48** | **0.69** | 1) Dr. R. N. Six for repair work of Autopsy Center and Mortuary at Cooper Hospital, Vileparle. Commissioner (Planning), Brihanmumbai Mahanagara Palika for the said work amount Rs. 2,23,22,110/- has been sanctioned. Out of the said amount Rs. Rs. 44,64,422/- first installment (20% fund) disbursement orders have been passed on 19/01/2023. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 2) Repair work of Autopsy Center and Mortuary at Rajawadi Hospital, Ghatkopar (East). Commissioner (Planning), Brihanmumbai Mahanagara Palika for the said work amount Rs. 1,24,74,336/- has been sanctioned. Out of the said amount, an amount of Rs.24,94,867/- has been disbursed as first installment (20% fund) on 19/01/2023. Both the above works are in progress and the remaining funds are being disbursed. |

---------------********--------------

GOVERNMENT OF MAHARASHTRA

# मुंबई उपनगर जिल्हा खनिज प्रतिष्ठान

## (Mumbai Suburban District Mineral Foundation)

### जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल (सन-२०२३-२४)

### जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा

### Collector Office, Mumbai Suburban District

# जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा




## जिल्हा खनिज प्रतिष्ठान, मुंबई उपनगर जिल्हा वार्षिक अहवाल- मराठी

## सन-२०२३-२४

# जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल (सन-२०२३-२४)

## District Mineral Foundation Annual Report (2023-24)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ४ |
| २ | प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेचे उद्दिष्ट | ४ |
| ३ | प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची व्याप्ती | ५ ते ६ |
| ५ | नियामक परिषद आणि व्यवस्थापकीय समिती रचना | ८ ते १० |
| ६ | लेखा धोरणांचे विवरण | १२ |
| ७ | वार्षिक ताळेबंद | १३ ते १४ |
| ८ | वार्षिक लेखा अहवाल | १५ |
| ९ | संबंधित आर्थिक वर्षात जमा/खर्च महसूल/डीएमएफ निधी | १६ |
| १० | निधी वितरीत कामाचा तपशील | १७ |

## प्रस्तावना:-

### अ) जिल्हा खनिज प्रतिष्ठानबाबत :-

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम ९ ब चे उप-कलम (२), (३), (४), (५) व (६) कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यातील महाराष्ट्र राज्याची प्रयुक्ती व प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) च्या तरतुदी अंतर्भूत करण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम २० ए अंतर्गत भारत सरकारने निर्गमित केलेल्या दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने भारत सरकार, खाण मंत्रालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान गठित करण्याबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने जिल्हा खनिज प्रतिष्ठानची रचना व कार्ये आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये रकमा प्रदान करणे च्या पध्दतीचे विनियमन करण्याकरीता महाराष्ट्र **जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम,२०१६** तयार केले आहेत. सदर नियमामध्ये **नियामक परिषद (Governing Council) व व्यवस्थापन समितीची (Managing Committee)** रचना व समितीचे अधिकार व कार्य अधिसुचित केलेले आहेत.

### १) योजनेची उद्दिष्टे :-

१) खाण आणि खनिजे (विकास आणि विनियमन) दुरुस्ती अधिनियम, १९५७ च्या अंतर्गत डीएमएफ ना नफा विश्वस्त ट्रस्ट आहेत ज्यायोगे खाण संबंधित कार्यात प्रभावित व्यक्ती आणि क्षेत्राच्या हितासाठी आणि त्यांच्या फायद्यामध्ये काम करण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने विहित केलेले आहे.

२) जिल्ह्यातील खनिकर्म कामाशी संबंधित कार्यामुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्राचे हितसंबंध लाभ शाश्वत विकासासाठी कामे करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे.

३) जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये जमा निधीचा परिणामकारक पारदर्शक व जबाबदार पद्धतीने वापर करणे.

४) जिल्ह्यातील खनिकर्म किंवा खनिकर्म कामाशी संबंधित कार्यांमुळे बाधित व्यक्ती किंवा क्षेत्रांचे हितसंबंध, लाभ, शाश्वत विकासासाठी, कामे करणे हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे.

### २) अंमलबजावणीचा तपशील :-

शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील अधिसूचना क्रं. एमडीएफ-०६१५/प्र.क्रं. ३४/उद्योग-०९ दि. ०१/०९/२०१६ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याचे अधिसुचित केलेले आहे. सदर अधिसुचनेनुसार परिच्छेद क्रं. ०१ मध्ये नमुद केले आहे की, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान ट्रस्ट (DMFT) ची स्थापना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या जिल्ह्यात दि. **२१.१०.२०१६** पासून **गौण खनिज स्वामित्वधनाच्या** १०% रक्कम **जिल्हा खनिज प्रतिष्ठान, मुंबई उपनगर जिल्हा** यांचे बचत खात्यामध्ये जमा केली जात आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचा शासन निर्णय क्रमांक **एमडीएफ-०६१५/प्र.क्र. ३४/उद्योग-०९, दि.०१.०९.२०१६** अन्वये प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) संदर्भातील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार बाधित क्षेत्र (उदा. उत्खनन क्षेत्र, खनिकर्मामुळे बाधित होणारे क्षेत्र् इत्यादी) तसेच अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले असून अशा क्षेत्राची यादी तयार करण्याबाबत

नमूद करण्यात आले आहे. तथापि, मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार खाणपट्टे म्हणून कोणत्याही जमिनी आरक्षित केलेल्या नाहीत. त्यामुळे **मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये दगडखाणी व खाणपट्ट्यांना कोणतीही परवानगी दिली जात नाही** तसेच दगडखाणी, खाणपट्टे किंवा मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यासाठी **भाडेपट्टे देण्यात आलेले नाहीत**.

**१) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची व्याप्ती :-** प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना मधील प्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरीत कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. प्रस्तुत योजनेत खाण बाधित क्षेत्राचा विकास करताना हाती घ्यावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**अ) उच्च प्राथम्य बाबी** - ज्या ठिकाणी योजनेतील किमान ६०% निधी खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

**I) पिण्याचे पाणी पुरवठा:-** केंद्रीभूत जलशुध्दीकरण यंत्रणा, जलप्रक्रिया केंद्र, तात्पुरती/शाश्वत जल वितरण सुविधा ज्यामध्ये एकल पाणी पुरवठा योजनेचा समावेश असेल, जल वितरण पाईपलाईन टाकणे.

II) **पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रण उपाययोजना :-** सांडपाणी प्रक्रिया केंद्र तलाव भूजल नाले व अन्य जल स्त्रोतांचा प्रदूषण नियंत्रण खाणकाम व डम्सच्या कृतीमुळे त्या क्षेत्रात होणाऱ्या वायू व जल प्रदूषण कमी करणे. खाण सांडपाणी व्यवस्था, पर्यावरण सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता चालु व बंद खाणीतील जल, वायू व जमीन प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व खाण प्रदूषण प्रतिबंधक तंत्रज्ञान, आणि उपाययोजना.

III) **आरोग्य:-** खाण बाधीत क्षेत्रामध्ये प्राथमिक/माध्यमिक आरोग्य सुविधा पुरविणे हे उद्दिष्ट असावे. यामध्ये केवळ आरोग्य पायाभूत सुविधा निर्मितीवर भर नसावा पण त्यासोबत आवश्यक मनुष्यबळ साधन साहित्य देखील पुरविण्यात याव्यात जेणेकरून परिणामकारकरित्या उपयोगात येतील. याव्दारे निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा स्थानिक प्रशासन, राज्य व केंद्र शासन यांच्याव्दारे निर्माण केलेल्या अस्तीत्वातील आरोग्य सुविधाला सहाय्यभूत असतील. खाणीशी निगडीत आजार व रोगांवर उपाययोजना करण्याकरिता नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मायनर्स हेल्थ (**National Institute of Miner's Health**) यांच्याकडील तांत्रिक सहाय्य घेवून विशेष सुविधा निर्माण करता येतील. खाण बाधीत व्यक्तींच्या गट आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी करता येईल.

IV) **शिक्षण** :- शाळेची इमारत बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम, प्रयोगशाळा, वाचनालय, कलावर्ग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी सुविधा, शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता निवासी होस्टेल, क्रिडा सुविधा, शिक्षक व अन्य सहाय्यभूत कर्मचारी यांच्या सेवा, ई-शिक्षण सुविधा, अन्य परिवहन सुविधा जसे बस / सायकल / रिक्षा/ इत्यादि. पोषण आहार निगडीत कार्यक्रम राबविणे.

V) **महिला व बालविकास:-** प्रस्तूत योजनेअंतर्गत माता व बाल आरोग्य कुपोषण, संसर्गजन्य आजार यांच्याशी निगडीत समस्यांवर उपाययोजना घेता येतील.

VI) **वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण :-** प्रस्तूत योजने अंतर्गत वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण योजना हाती घेता येतील.

VII) **कौशल्य विकास:-** स्थानिक पात्र व्यक्तींच्या आर्थिक प्रगती व उत्पन्न वाढीसाठी व उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास, प्रकल्प/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्र,स्वयंरोजगार योजना व स्वयंसहाय्यता गटांना सहाय्य

VIII) **स्वच्छता :-** कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता, मल निस्सारण प्रक्रिया केंद्र, सार्वजनिक स्वच्छतागृहे व इतर अनुषंगिक सुविधा

**ब) अन्य प्राथम्य बाबी:-** ज्या ठिकाणी प्रस्तुत योजनेतील कमाल ४०% निधी खर्च करता येईल. त्यामध्ये भौतिक पायाभूत सुविधा रस्ते, पुल, रेल्वे व जल वाहतूक प्रकल्प इत्यादी कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

## ३) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्र :-

**मुंबई उपनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ३६९ चौ.मी. इतके आहे. या जिल्ह्यात एकूण २ उप विभाग (उप विभागीय अधिकारी पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय) व ३ तालुके (अंधेरी , बोरीवली, कुर्ला) आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या उत्तरेस ठाणे जिल्हा, दक्षिणेस मुंबई शहर जिल्हा, पूर्वेस ठाणे खाडी, व दक्षिणेस अरबी समुद्र अशी भौगोलिक रचना आहे.**

मुंबई उपनगर जिल्हा हा संपूर्णपणे शहरी भू-भाग आहे. सदर जिल्ह्यामध्ये आज रोजी कोणताही खाणपट्टा व वाळूघाट अस्तित्वात नाही. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये सन २००६ नंतर दगड खाणपट्टे/खाणी बंद झाल्या आहेत. म्हणजेच सदर खाणी १९- २० वर्षापूर्वीच बंद झालेल्या आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात खाणपट्टे अस्तित्वात नसल्याने गौण खनिजांच्या खाणपट्ट्यांचे लिलाव करण्यात येत नाहीत. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये कोणतीही प्रमुख नदी/खाडीपात्रात उपयुक्त वाळू/रेती उपलब्ध नसल्याने या जिल्ह्यामध्ये वाळू/रेती उत्खनन व वाळू व्यतिरिक्त अन्य गौण खनिजांचे लिलाव होत नाहीत. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये खाणबाधित क्षेत्र नाही. या जिल्ह्यात प्रामुख्याने नव्याने बांधल्या जाणा-या किंवा पुर्नविकास होणा-या इमारतीच्या बांधकामासाठी करण्यात येणा-या पाया/तळघर खोदकामाकरीता तात्पुरते गौण खनिज परवाने देण्यात येतात.

## ५) संबंधित आर्थिक वर्षामध्ये नियामक परिषद आणि व्यवस्थापकीय समिती यावर असलेल्या सदस्यांची नावे :-

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक ०१/०९/२०१६ मध्ये प्रसिध्द अधिसुचनेत महाराष्ट्र राज्यातील सर्व महसूली जिल्ह्यामध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान (**District Mineral Foundation Trust**) स्थापन करण्याचे अधिसुचित केलेले आहे. सदर अधिसुचनेनुसार परिच्छेद क्रं. ०१ मध्ये नमुद केले आहे की, "सदर अधिसुचनेनूसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात (**बृहन्मुंबई जिल्हा वगळून**) जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करून नियामक परिषद व व्यवस्थापन समिती स्थापन करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

